म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2808

REFBK-0022707
REFBK-0022707

# का फि ला

अंदमै
२२७००५
मा ग्रं
२५०४
१०/१०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्रु. मा. प.)

"वाचे बरवे कवित्व कवित्वी रसिकत्व" – ज्ञानेश्वर

कवि मंडळ,

नासिक.

प्रणीत —

प्रातिनिधिक कविता संग्रह

# का फि ला

प्रस्तावना —

– कुसुमाग्रज

✠ प्रकाशक
ग. म. अंधृटकर
संस्थापक, कवि मंडळ, नासिक.

✠ मुद्रक
विजय त्र्यं. दाते
प्रविन प्रिंटिंग प्रेस,
१६०१, नगरकर लेन, नासिक–१.

✠ सर्व हक्क
कवि मंडळ, नासिक यांचे स्वाधीन

✠ पृष्ठ संख्या साठ

✠ प्रथमावृत्ती
मे १९७३

✠ **किंमत तीन रुपये**

# प्रस्तावना

## शुभेच्छा

नासिकमधील ‘कविमंडळ’ ही संस्था चांगली कार्यप्रवण आहे. गेल्या चार पांच वर्षात नवीन कवींना प्रोत्साहन देण्याचे आणि रसिकतेचे वातावरण निर्माण करण्याचे काम मंडळाने चांगले केले आहे. त्याच संस्थेच्या वतीने प्रस्तुत कवितासंग्रह प्रकाशित होत आहे. संध्या काव्य लेखन पुष्कळ होत असले तरी उत्साहाने काव्याचे प्रकाशन करणारी नियतकालिके तशी कमीच आहेत. काव्य लेखन कवी स्वतःच्या समाधानासाठी करीत असले तरी, ते समानधर्मी रसिकांपर्यंत पोचल्यावरच या समाधानास पूर्तता लाभते. या परिस्थितीत अशा प्रकारचे संग्रह कवींनी अथवा कवींच्या संस्थांनी प्रकाशित करणे अपरिहार्यच आहे. कविमंडळाने हे काम हाती घेतल्याबद्दल मंडळाच्या कार्यकर्त्यांस मी धन्यवाद देतो.

हा संग्रह नासिकच्या कवींपुरता मर्यादित नाही. खांडव्यापासून कराड पर्यंतच्या अनेक कवींचा त्यात समावेश आहे. यातील, श्री. शांताराम नांदगांवकरांसारखी काही नांवे रसिकांना परिचित आणि प्रिय आहेत. पण, संग्रहातील बहुसंख्य कवी नवीन आहेत. आपापली काव्ये घेऊन प्रथमच रसिकांसमोर येत आहेत, असे मला वाटते. या दृष्टीने काव्याकडे वळणारे, काव्यातून आविष्कृत होऊ पाहणारे तरुण मन . कोणत्या भावानुभवात गुंतलेले आहे, कोणत्या रचना प्रकारांचा आणि शब्दशैलीचा ते आश्रय घेत आहे, याचे ओझरते दर्शन या काफिल्यात होते.

कवितेचे आणि रसिकाचे नाते हे राधाकृष्णाच्या नात्यासारखे आहे. असे श्री. नरेश महाजनांनी म्हटले आहे. राधाकृष्णाचा संबंध हा केवळ प्रेमाचा किंवा उपभोगाचा संबंध नाही. परस्परात होणाऱ्या सर्वात्म विसर्जनाचे सूत्र त्यात प्रमुख आहे. कविताही त्याचप्रमाणे रसिकाला केवळ आवडून चालत नाही. ती त्याच्या अंतरंगात भिनावी लागते. कवितेतील अनुभूती ही त्याचीच अनुभूती व्हावी लागते. हे यश फार थोडया कवींना आणि काव्यांना लाभते. पण, त्या दिशेने प्रवास करणाऱ्या अनेक कविता या संग्रहात आहेत.

सर्वश्री शांताराम नांदगांवकर. त्र्यं. शं. देशमुख, पंढरीनाथ सोनवणी, किशोर दीक्षित, पदमाकर कांबळे या कवींच्या गीतात्मक रचनांना आपली लय आणि रंगीबेरंगी शद्व शैली गवसलेली आहे. पण हे कवी आता नाविन्याच्या कक्षेत राहिलेले नाहीत. आपापल्या वाटा त्यांना सापडलेल्या आहेत. परंतु नाविन्याच्या कक्षेत असलेल्यातही "माहित होतं", "मी", "अहंकार", "सांजवात", "बांगला", "ऊन आज आजारलं", "माध्यान्ह", "जीवन ज्योत" इत्यादि कविता आपल्या सुश्लिष्ट आविष्काराने मनोवेधक वाटतात.

एक गोष्ट उल्लेखनीय वाटते की, या संग्रहातील कविता अनाकलनीय अथवा संकरित अशा शैलीच्या काळोखात स्वतःला हरवून बसत नाहीत. सुबोधता हा काव्याचा महत्वाचा गुण होऊ शकत नाही. हे तर खरेच. पण चांगल्या संस्कारित रसिकतेलाही दाद न देणारी कविता रसिकाच्या बाजूने तरी कंटाळवाणीच ठरणार आणि असे होण्याची खरोखर गरजही नसते.

खास आजच्या काळाचा म्हणून जो प्रतिक्रियात्मक आशय आहे तो नितळ स्वरुपात व्यक्त होऊ शकतो. त्या दृष्टीने या संग्रहातील "ययाती", "सावली", "प्रवासी", "तू पाहतांना", "दोन कविता", "शल्य" "अंपायर", "शून्य", 'सोबत", "जीवनप्रवास", "काफिला" इत्यादि कविता पाहण्यासारख्या आहेत.

अकंदरीत या संग्रहाला तसे कोणतेही प्रातिनिधिक रूप नसले तरी, आपल्या मर्यादेत आज आकारास येत असलेल्या कवितेचे एक आशादायक चित्र तो उभे करतो. मी सर्व कविंना त्यांच्या पुढील प्रवासात सुयश इच्छितो.

— वि. वा. शिरवाडकर
( कुसुमाग्रज )

# मनोगत.....

"कवि मंडळ, नासिक" तर्फे प्रकाशित होत असलेला 'काफिला' हा प्रातिनिधिक स्वरुपाचा काव्यसंग्रह रसिकांच्या हाती देत असताना, आम्हास अत्यंत आनंद होत आहे.

मंडळाची स्थापना कवि केशवसुतांच्या जन्मशताब्दी दिनी ( १५ मार्च १९६५ ) नासिकचे जुने, जाणते कवि व एक क्रियाशील सामाजिक कार्यकर्ते श्री. ग. म. अघृंटकर ह्यांनी केली असून गेली ५।७ वर्षे ही संस्था नासिक शहरात रविंद्र मंडळ, सोमवार पेठ, यांच्या सहकार्याने आपले कार्य जिद्दीने पार पाडीत आहे.

नवोदित कविंना उत्तेजन देऊन त्यांच्यातील सूप्त काव्यशक्तीला सतत प्रेरणा देत रहाण्याचं महद्कार्य ही संस्था करीत आली आहे. त्या दृष्टीने प्रतिवर्षी जिल्हा पातळीवरची कविसंमेलनं तसेच नवोदित कविंच्या कवितांचे ३ हस्तलिखित काव्यसंग्रह ही या संस्थेची जमेची बाजू सांगता येईल.

वेळोवेळी महाराष्ट्रातील अनेक नामवंत कविश्रेष्ठींनी मंडळाला आपल्या बहुमोल मार्गदर्शनाचा लाभ करुन दिला आहे. त्यातही सर्वश्री ग. दि. माडगूळकर, मंगेश पाडगांवकर, राजा बढे, पी. सावळाराम, शांता शेळके, कवि यशवंत आदींचे ऋण केवळ शद्बातीत आहे.

तसेच महाराष्ट्राचे लाडके कवि कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांचा कृपालोभ मंडळावर सतत आहे. त्याच प्रेमातून त्यांनी प्रस्तुत संग्रहासाठी आपली प्रस्तावना आम्हाला उपलब्ध करुन दिली आहे. मंडळाला ही मोठी भाग्याची व अभिमानाची गोष्ट आहे.

सदर संग्रहासाठी आम्हाला अत्यंत उस्फूर्त प्रतिसाद मिळाला तसेच हा संग्रह संपादित करण्याच्या दृष्टीने श्री. प्रफुल्ल चौधरी व श्री. अ. द. मैंद ह्यांनी केलेले सहकार्य खरोखरच कौतुकास्पद आहे. त्याबद्दल त्यांचे व ज्यांनी ज्यांनी संग्रहाला अमोल असे सहकार्य दिले, त्या सर्वांचेच आम्ही मनापासून आभार मानतो. व हा 'काफिला' रसिकांच्या हृदयांतर्गत पोहोचेल असा विश्वास व्यक्त करुन आपली रसिली दाद मागतो.

**पद्माकर कांबळे,**
अध्यक्ष

# अनुक्रमणिका



| कविता | | कवी |
|---|---|---|
| १) | शब्दवेडा | नरेश महाजन |
| २) | दोन कविता | कु. साधना कुलकर्णी |
| ३) | रितेपण | त्र्यं. शं. देशमुख |
| ४) | रडायचे आहे मला | व्ही. ए. नाईक |
| ५) | माहित होतं | कु. शैलजा ज. वाडेकर |
| ६) | चारित्र्य | सुरेश दहिभाते |
| ७) | मी वेदना | प्रसाद दत्त पाठक |
| ८) | गझल | पद्माकर कांबळे |
| ९) | तू पाहाताना | कृष्णनाथ कुलकर्णी |
| १०) | ययाती | विजयशील कुलकर्णी |
| ११) | सावली नसलेल्या रस्त्यावर | विलास कुलकर्णी |
| १२) | प्रवासी | सतीष नाडगौडा |
| १३) | तू गवसत नाहीस | कु. शोभाकिरण कुरंभटे |
| १४) | ॥ ० ॥ | किशोर पाठक |
| १५) | वटवाघुळ | सुरेश भोसले |
| १६) | स्वप्नफुलास | महादेव साने |
| १७) | मंदकड्या | कमलाकर वैद्य |
| १८) | शल्य | मंगेश विरारी |
| १९) | अम्पायर | प्र. द. कुलकर्णी |
| २०) | अशी असावी कविता | गोपाळ देशपांडे |
| २१) | बांगला विजय | मनोहर मारवाडकर |
| २२) | एक उष्ण प्रश्नचिन्ह | मोहन कुलकर्णी |
| २३) | सामाजिक शिकवण | भगवान मोरे |
| २४) | सांजवात | ग. म. अंधृटकर |
| २५) | सांगाती | मधुकर निकम |

| कविता | कवी |
|---|---|
| २६) ऊब | प्र. ना. नेमाडे |
| २७) बिंदू | शशिकांत सोहोनी |
| २८) अहंकार | अण्णा म. तोडकर |
| २९) ईश्य | रा. म. तोडकर |
| ३०) मला वाटते | श्रीकृष्ण जोशी |
| ३१) वेल | विठ्ठल ज. सदामते |
| ३२) या पहाटे | शांताराम नांदगावकर |
| ३३) गीत | पंढरीनाथ सोनवणी |
| ३४) मैफिल | किशोर दीक्षित |
| ३५) माझा गाव | मुरलीधर खैरनार |
| ३६) ऊन आज आजारले | कु. नीलिमा टेंबे |
| ३७) जीवनज्योत | लक्ष्मीकांत जोशी |
| ३८) मी ना कुंती | चंद्रकांत स. सावळे |
| ३९) गोष्ट गहिरी | ना. भा. औटी |
| ४०) अरे मानवा मानवा | सौ. कुसुम कोल्हापुरे |
| ४१) सज्जनांच्या जीवनाला | सौ. मनोरमा जोशी |
| ४२) करा जनतेची सेवा | माधव जोशी |
| ४३) दर्शन | प्र. ल वैद्य |
| ४४) एक जीवघेणी सोबत | विलास चौधरी |
| ४५) जीवनप्रवास | अनिलकुमार मैंद |
| ४६) आनंद | कृष्णकांत पवार |
| ४७) सायंतन | प्रकाश ज. शिंपी |
| ४८) घरोघर मातीच्या | राम गंभीरे |
| ४९) होता पखरण | कृष्णकांत नांदगांवकर |
| ५०) माध्यान्ह/सुख | कु. हेमलता निजामपूरकर |
| ५१) प्रलय | कु. वसुधा वेलगावकर |
| ५२) काफिला | प्रफुल्ल चौधरी |

# शद्बवेडा

शद्ब माझे सवंगडी
शद्बांचाच मला ध्यास
शद्ब शद्ब जुळविणे
हीच माझी क्रीडारास

शद्बानंदाचा हव्यास
शद्बांवरीच विश्वास
शद्बवेडा मी इतुका
शद्ब हेचि झाले श्वास

माझ्या शद्बांची दुनिया
मला वाटते गोकुळ
नाही इथे मी कधीही
झालो व्याकुळ व्याकुळ

सारे रसिक ते कृष्ण
माझी कविता ही राधा
तिला रसिका समोरी
होते शद्बांचीच बाधा

दाद रसिकांची हवी
जशी बासरी घुमावी
त्याच तालावर पुन्हा
माझी प्रतिभा फुलावी !

— नरेश महाजन
नासिक.

# दोन कविता

नाही सोस मला शब्दांचा
गंधवेडी मी मुळीच नाही
स्वरा सूरांच्या संगतीतही
माझी तहान नीवत नाही
तरी तुझ्या गीतासाठी
शब्द-शब्द जुळवित बसते
वेडी मी फुलातही
तुझी आवड शोधीत असते
अन् तुझ्या बासरीच्या
सूरमयी विश्वात
हरवून जाते–हरवून जाते !

माझ्या गुलमोहरी व्यथेला
आकाशाची निळाई देते आर्तता
अन् दिटीतील अश्रुंना
सागर अर्पीतो अथांगता
मन मात्र मागत आहे
धरित्रीची सहनशीलता

— साधना कुलकर्णी
अहमदनगर.

# रितेपण !

अजून मजला स्मरते संध्या
भागीरथीचा चंद्र किनारा
शद्वा शद्वातुनी मोकळा
फुलला होता मोरपिसारा ॥ १ ॥

जुळले होते सूर परन्तु
नव्हती जुळली संवादी सम
तरिही कोरले स्वप्न गुलाबी
भविष्यातले मृदु मुलायम ॥ २ ॥

भाव सुगंधातुनी ओविले
नक्षत्रांचे धुंद कवडसे
आणि मनाला बिलगुन वसले
शद्व मखमली हवे हवेसे ॥ ३ ॥

आठवते ती अजून संध्या
स्मर विव्हल मी अजून वेडा
हुंगत वसतो एकांती या
चर्चे मधला गंध केवडा ॥ ४ ॥

उडून गेला रंग गुलाबी
धुंद कवडसे गेले त्यातून
नदीकाठची रेती उरली
आणि मनाचे शुद्ध रितेपण ॥ ५ ॥

— त्र्यं. शं. देशमुख
पिंपळनेर.

# रडायचे आहे मला !

कसे ?
कसे रडायचे ?
रडायचे आहे मला
रडतच वेड्या मना
थोपटीत थोपटीत
फुंकायाचा आहे का दीवा ?
रडायाचे ?
का ?
कुठे आणि केव्हा ?
कसे ? आणि कुणापाशी ?
इथे मुक्या जीवालाही
आसवांचा येतो वास !

— दिपाग्रज
( व्ही. ए. नाईक )
दादर, मुंबई-२८.

# माहीत होतं !

माहीत होतं कधीतरी
असं दूर जायचंय....
दूर जाता....जाता असं
डोळा भरुन पहाचंय.......

माही होतं कधीतरी
माझी वाट फुटायचीय्
फुटणाऱ्या वाटेवर
असं पाऊल अडायचंय........

माहीत होतं कधीतरी
रेशीम धागा तुटायचाय्
डोळा रक्त उतरतांना
काजळकाठ हिंदकळायचाय्.......

छे 'तसं' काहीच नव्हतं
म्हणतं जग भुलवायचंय....
हासून वर उगा खोटं
पापणीत पाणी जिरवायचंय्.......

माहीत होतं कधीतरी
असं साऽऽरं संपायचय....
रक्ताळली पावलं घेऊन
असंच चालत रहायचंय !

— कु. शैलजा ज. वाडेकर
सातारा.

# चारित्र्य

मी शोधतो आहे....
त्या मीराला, या जगात !
कोपरा न कोपरा शोधतो आहे.

खरेच....!
मला दिसेल का, ती....
या जगात ?

सौंदर्याचे भांडवल....
देहाची विटंबना....
अन् वासनेची लक्तरे असलेल्या
या जगात !

असेल काय ती ?
गिरीधरासाठी विषकुंभ पीणारी....
मी शोधतो आहे ती.... !
काळाच्या ओघात केव्हाच गडप झाली आहे

फक्त....
एक धूसर आकृती....
ती मीराच का ?

— सुरेश दहिभाते
मनमाड.

# मी

निखाऱ्यांना मिठी मारत मारत
मी सजवलं दुःखाचं गाव
तुला माझी म्हणत म्हणत
पुसत गेलो माझंच नाव

पायातले भोवरे वाढले तसा
मीच चक्रव्यूह बनून गेलो
माझ्याच गावात मी नंतर
परदेशी म्हटला जाऊ लागलो

# वेदना

मनाचे काचपात्र
घावाने तडकले
व्यथेच्या दैवाला
अश्रुंनी वेडावले.
डोळ्यातला धुंद चंद्र
चुरगाळला वेदनेने
आभाळाने माळलेले
विस्कटले चांदणे

— प्रसाद दत्त पाठक
जामनेर.

# गझल

साऱ्याच प्रेमिकांचे हे हाल पाहिले मी
वणव्यात राहणारे ते सूर्य पाहिले मी !!

राजा कुणी कुणाचा राणी ही तो दिवाणी
स्वप्नातले तयांचे शृंगार पाहिले मी ॥ १ ॥

वादे असेच त्यांचे सौदे ही ते निराळे
खाली खिसे तरीही ते कर्ण पाहिले मी ॥ २ ॥

असतो गुन्हा कुणाचा होते सजा कुणाला
शापीत प्रेषितांचे हे राज्य पाहिले मी ॥ ३ ॥

आकाश पेलणारे पृथ्वीस जिंकणारे
पत्त्यातल्या प्रजेचे सम्राट पाहिले मी ॥ ४ ॥

— पद्माकर कांबळे
नासिक.

# तू पहातांना !

तू पहाताना
मी पायाखालच्या जमिनीच्या कणांचे
आभार मानले
कारण....
मी बेहोश झालो असता
त्यांनीच तर मला सावरून धरलं होतं
पण एकदा....
कधी तरी तू मला
पाहिलं न पाहिल्या सारखं केलंस
तेव्हा मात्र....
माझ्या डोक्यावरच्या आभाळालाच
भोवळ आली.
तू पहाताना....
कधीतरी भरुन आलं होतं हृदयाचं तळ !
त्यात उमलली होती कित्येक स्वप्न कमळे !
तेव्हा वाटलं मी राजा झालो त्या नगरीचा
जी नगरी फक्त रात्रीच चमकत होती – खुलत होती –
आपल्या सहवास चांदण्यात !
विरहाचा सूर्य तर कुठल्या कुठे डूबला होता.
तू पाहताना....
काय व कसं होतं म्हणून सांगू ?

— **कृष्णनाथ कुळकर्णी**
**नासिक.**

# ययाती

कौतुक सुखाचे अंगावर वागवीत ....
कटाक्ष कौतुकाचे अंगावर झेलीत
मी घरात येतो,
— आणि
माझी ती लाडकी ....
नेत्रांची निरांजने करुन मला ओवाळते.
– दृष्ट लागू नये म्हणून !
डोळ्यातले काजळ गालावर टेकवते !!
तेव्हा मनोमन वाटते,
आजन्म ब्रम्हचारी राहणारा वीर कार्तिकेय
कितीमूर्ख !
पण नंतर ....
ती उमलायच्या समेवर आलेली कळी
रात्रीच्या राजबिंड्या एकांतात ....
मला बिलगते–नसानसात भिनते !
तृप्तीच्या लाटांवर अतृप्तीचे वणवे पेटविते !!
तेव्हा वाटते,
स्त्रीसाठी पुत्राचे तारुण्य उसने मागणाऱ्या
ययातीला वेडा म्हणण्यात गफलत होतेय
कारण त्या क्षणी
मी तेच वेड जगत असतो.

— **विजयशील कुलकर्णी**
**अहमदनगर.**

# सावली नसलेल्या रस्त्यावर

सावली नसलेल्या रस्त्यावर,
जीव मुठीत घेऊन....
उभ्या राहिलेल्या ह्या घरात....
तू दिसताच आश्चर्य वाटलं
फार दिवसांची इच्छा उन्मळून आली....
तू बनवलेला .... तुझा चहा प्यावा....
तशी मागणी मी पूर्वीच घातली होती
पण निती नियमाच्या फळीने ...
माझ्या इच्छांचा चेंडू ....
तू अगदी सिमेपार पाठवलास
तेव्हापासून तो घरंगळतच राहिलाय....
फरक इतकाच ....
आता दोघांच्याही हेअर स्टाईलवर
पांढरी झाक खुलते आहे.
आणि म्हणून की काय ?
तू मारलेल्या टोल्यांची आठवण काढीत,
मला घरंगळतच राहीलं पाहिजे ....
सावली नसलेल्या रस्त्यावर.... !

— विलास कुलकर्णी
मनमाड.

# प्रवासी

जगाच्या या वेटींगरुममध्ये
आपण दोघे औट घटकेचे प्रवासी !
मी....वाट चुकलेला दिशाहीन !
तू....कोणाच्या आठवणीत ?
थोडं पुढं सरकावं, आपलंसं करुन....
थोडसंच तेल मागावं....
असं वाटत असतानाच....
तुझी वेळ झाली.
एका बळकट बाहुंचा सहारा....
तू घेऊन गेलीस.
पण, मी अतृप्त नाहीय,
हे सांगायचं राहून गेलं.

— सतीष नाडगौडा
नासिक.

# तू गवसतच नाहीस !

बोथटलेल्या जाणीवांना
आठवणींचे कंगोरे
अस्फुट .... अस्पष्ट
स्पर्श–अस्पर्शाच्या सीमारेषेवर !

दूर अंतरावरून
काहीशा परिचित लाटा
नादावत असतात
दुर्बोधपणे !

ती काळोखी छाया तुझीच असते,
तो सुगंधी श्वास तुझाच असतो,

चाचपडून पहाता .... पहाता
मी शिणून जाते ....
हेलावून जाते....
पण तू मुळी गवसतच नाहीस !

— कु. शोभाकिरण दत्तात्रय कुरुंभटे
बांद्रा, मुंबई.

## !! ० !!

ह्या आकड्यांच्या गर्दीत मी कोलमडतोय् गडगडतोय्
कड्यावरल्या शिळे सारखा ! अस्तित्व नसलेल्या....

दीर्घ कालीन .... या आकड्यांमध्यें मला ओळखणारी
अशी फक्त शून्ये आहेत.

त्यांच्या भयाण पोकळीत मी मला साठवतोय.
त्यांच्यातच जगतोय वाढतोय – खेळतोय –
आणि वाटतं, मीही एक शून्य बनलोय !

भयाण फुगीर पोकळी बनवून बसलेलं.
स्वतः संपल्यामुळे इतरांना समान इच्छिणारं.

माझ्या शृंखला....
म्हणजे ह्या शून्यांच्या वर्तुळाचे
परीघ आहेत.

आणि अनेक जीवंत प्रेरणा....
घोटाळताहेत,

या भयाण पोकळीमध्ये
माझ्या शून्यत्वाची ही
याद न देण्यासाठी !

— किशोर पाठक
पुणे.

# वट वाघुळ

विषण्णतेची खोलदरी
रुंदावत होतेय
भयाण
त्यातली काळोखी
प्रकाश पहात....
जीवनाच्या हिशेबांची पाटी,
असंख्य आकड्यांनी भरण्यासाठी
होतेय खाडाखोड
केविलवाणी ही धडपड
पहात आलंय अंधारात
उलटं वटवाघुळ !
काळी कृत्ये उजेडात करणाऱ्या
न्याहाळीत मानवाची
उलटं जग, उलटे होऊन पहातं
वटवाघुळ आहे समाधानात
अवघ्या जगाचीही
आंधळी रीत
पहात....!

— सुरेश नानासाहेब भोसले
सातारा.

# "स्वप्न फुलास"

आज कसे रे आले भूवर
हांसू उमले स्वप्न फुलावर
रे नियतीच्या क्रूर पटावर
विझूनि गेले दिपही सुंदर
होते जपले उरी खोलवर
दर्द मनाचे लोचनांत नीर
आठव सारे मनी कलेवर
नांदत होते दुःख अनावर
जपले होते वैभव सारे
उरी लेवूनीं दग्ध निखारे
आज कसे रे फुलले हांसू
स्वप्न कळीचे विरले आंसू
आज कळीचे फूल जाहले
गंध संपले रुप निमाले
सुरावटीचे सूर संपले
सरगम सारे स्वप्न जाहले.

— महादेव साने
कराड,

# मंदकड्या

कुठल्या अधान्तरी गंधाच्या आधारावर
साजरे करीत आहात तुम्ही हे सण ?
उष्टचा विचारांचे की
लोंबकाळणाऱ्या संस्काराचा ध्वनि
कोऱ्या कर्णपटलावर आदळून
पांचट मेंदूला गोठवण्याच्या
प्रयत्नात गाफिल झाले आहे–
तुमच्या कपाळावरील निम संस्कारी
– उभे–आडवे गंध !
उघडतात का तुमच्या
सिरेबेलमच्या घड्या ?
का पायदळी तुडवून
त्याच अर्धवट बादशहाने
ठोठावलेले दरवाजे .... !
कुठल्यामंद, गंज चढलेल्या कड्यांनी
अडकून पडल्यागत –
स्थिर झाल्यात विचाराच्या रिकाम्या पोतड्या !
संस्काराच्या संगीताने न भारावलेला
कोब्रा ओतू जाऊ लागेल –
तरी – दूधपाजण्याच्या अपयशी प्रयत्नात,
पाया पडण्याची चित्रे – बापुड्यांनो
मेनचट आंधळ्या नजरेने
पहात बसाल !

— कमलाकर वैद्य
औरंगाबाद.

# शल्य

धरती पादाक्रांत करायला
वामनाला तीन पावलं टाकावी लागली
पण सौदा ओलांडून अंथरलेल्या पैशावर
एकच पाऊल टाकलं त्या रात्रीनं

आणि सारी शुभ्र धरती
जळून खाक झाली.

ते आठवलं की आकाशाचे दोन्ही डोळे
भरभरुन पश्चाताप वहातात

एक डोळा चंद्र–दुसरा सूर्य....
आता राखेत मोती रुजत घातलाय...!

— मंगेश बिरारी
नासिक.

# अम्पायर

दाही दिशा छेदून अकराव्या .... बाराव्या ....
आणखी किती तरी दिशेंच्या शोधात
अन् नशेतही, !
इथं तर अवघा मानवच पळत सुटला आहे.
यानाचे लगाम खेचीत,
अन मोकाटही, झिंगलेल्या घोड्याप्रमाणे !
तर कुणी नुसताच पळतोय,
लहान मुलांनी चंद्राबरोबर पळत जावे तसे !
तुझी ही पळती कधी थांबणार आहे का रे ?
"थांबला तो संपला"
म्हणजे पळत रहाण्यासाठी तुझीच ही पळवाट
तुला फक्त पळायचय् बस् पळायचय्
यानातला तू....
माघारा खटाऱ्याकडे येशील कसा ?
तुझ्या पळत्या मार्गात
तुला दिसतील कदाचित
तुझ्याच रिकाम्या शवपेटीका !
पिरॅमीडस् आणि थडगी ! !
किंवा चिता जळत्या स्मशानरांगा ! ! !
अरे म्हणूनच नाभीपासून कोकलतोय
तुझ्यातलाच एक मी — !
त्या खुदाला 'अम्पायर' तरी ठेव तुझ्या स्पर्धेत
कदाचित उगवेलही दुसरा सूर्य
तुझ्या पळत्या माथ्यावरून !

— प्र. द कूलकर्णी पुणे

# अशी असावी कविता

अशी असावी कविता
विसरुनि जावे क्षणदुःखाचे
रसिकांना गुणगुणता – ॥ धृ ॥
सुबोध उत्कट भावामधुनी
सहज असावी शद्ब मांडणी
"मांडणीतही" खुलुन दिसावी
भाषेची ऋजूता– ॥ १ ॥
नितान्त सुंदर रम्य कल्पना
स्वरा सुरांच्या मंजुळ ताना
या "तानांना" कंठ फुटावे
आमोदाने गाता – ॥ २ ॥
कढ दुःखाचे त्यात दिसावे
क्षण सौख्याचे त्यात हसावे
व्यंगा मधुनी आणि कळावी
मायावी पशूता – ॥ ३ ॥
जीवन म्हणजे काव्य जगाचे
चित्रांकन ते वास्तवतेचे
वास्तवात त्या फुलवित न्यावी
पुष्पाची मृदुता – ॥ ४ ॥
आशय त्यातील स्पष्ट असावा
'तिरकस' अथवा क्लिष्ट नसावा
'गूढवाद' तो हानीकारक
कथितो जाता जाता – ॥ ४ ॥

— **गोपाळ देशपांडे**
**नासिक.**

# बांगला विजय !

आज बांगला देश जिकला भारत विरांनी
धन्य धन्य ते शौर्य तयांचे आणिक कुर्बानी !!

'जिहादची' आरोळी ठोकून शत्रूभाव धरिला
'पडलो तरी पण नाक वरीच' हे याह्या ओरडला
अमेरिकेचे छत्र धरुनी वदला 'मी शूर'
भूत्तो वदला "सहस्त्र वर्षे लढेन भरपूर"
फोल तयाची कुटील गर्जना केली जवानांनी ॥ १ ॥

रणगाड्यांचे स्मशान केले आज जवानांनी
पाकी सैबर लोळविली ती नॅट विमानांनी
भारतीय नौदल नक्रासम गिळे पाक नौका
विश्व चमकले युद्ध थांबवा म्हणूनि करी हाका
अब्ज भुजा धारिणी इंदिरा देई सुयशक्षणी ॥ २ ॥

लढलो आम्ही स्वातंत्र्यास्तव करुनी बलीदाना
स्वातंत्र्याचे रक्षण करण्या देऊ क्षणी प्राणा
तोडाया त्या येईल त्याचे फुटेलक्षणी माथे
आलिंगाया येईल त्याशी प्रेमाचे नाते
दाखविले हे आज हिंदवी वीर जवानांनी ॥ ३ ॥

— मनोहर मारवाडकर
नासिक.

# एक उष्ण प्रश्न चिन्ह !

समाजवादी स्वप्नांच्या फुक्या घोषणा कशाला ?
नवसमाज निर्मीतीचा वृथा आभास कशाला ?

खुर्चीवर घट्ट बसून गरिबाचा कळवळा कशाला ?
उद्‌घाटनाच्या निमित्ताने लांबचे दौरे कशाला ?

शुभ्रपांढऱ्या झग्याखाली काळीकृत्ये कशाला ?
जनतेच्या कैवाराचा पोकळ डोलारा कशाला ?

लाचखोर करबुडव्यांचे 'देव्हारे माजविणे' कशाला ?
'गरिबी हटाव' खाली जन पिळवणूक कशाला ?

नाशवन्त जीवनाला जगविण्याचा अट्टाहास कशाला ?
दुष्काळी उन्हात जगण्याचा हा शाप माथी कशाला ?

— मोहन कुलकर्णी
कराड.

# सामाजिक शिकवण !

ती मागते आहे
उरलेले अन्न...
कटोऱ्यात !
डबक्यात ! !
करवंटीतही ! ! !
ती मागते आहे –
वर्षानवर्षे !
समाज सुधारकांच्या घरी !
राजकारणीच्या घरी ! !
आणि ते
तिला औदार्याने
उरलेलं देताहेत
कारण –
तिनं मागावं असंच !
त्यांनी औदार्यानं द्यावं असंच ! !
पिढ्यांनपिढ्या !
वर्षानुवर्षे
हीच जणु आमच्या
सामाजिक संस्कृतीची
शिकवण आहे.

— भगवान मोरे
(बांद्रा) मुंबई.

# सांजवात !

जलाशयावर झोके घेते / ही संध्यावात
क्षणात दिसते क्षणात लपते
क्षणात चमके पुन्हा जळात ॥ १ ॥

प्रकाश छाया दाविती माया
जणु आस निराशा खेळतसे
जलक्रिडा ती पाहुनि वाटे
जीवनात ही हेच असे ॥ २ ॥

हिन्दोळे तो दीप जरी तरी
स्थीर राहते सांजवात ती
जीवनात ही शान्त रहावे
अनिष्ठ येती किती जरी ॥ ३ ॥

— ग. म. अंधृटकर
नासिक.

# सांगाती

या उदास माळावरती
केलीस अविरत प्रीति
जो जळतो त्यावर प्रीति
तू धन्यधन्य सांगाती ।।१।।

मम जीवन शिंपल्यात
तू स्वातीचा जलबिंदू
उरी सौंदर्य झेलून
विभवात लोळतो सिंधू ।।२।।

वीमल कमलीनी तुझिया
डोळच्छाया सरोवरात
वेड लागल्या मधुकरास
केलेस तूच बंदिस्त ।।३।।

तू घन घटा नीलनभी
बरसते रिमझीम सरी
मी मत्त होऊनि नाचतो
थयथय मयूरा परी ।।४।।

मायेची करूनी वृष्टी
भिजविलीस माझी काया
आजन्म मधू संग हवा
भव भैरवी आळवाया ।।५।।

**मधुकर निकम**
**दाभाडी**

# ऊब

देवा, मी एक पंगू आहे
हिमगिरी मज चढणे आहे
नाना न्यूनांची मी मोळी
राधा वेडी साधी भोळी ॥ १ ॥

मेघःश्यामा धाव घेई
तमात या प्रकाश दावी
पायी विद्युत्–शक्ति देई
चढण्या उत्तुंग गिरीहि ॥ २ ॥

उठले जरि तुफान वादळ
मन माझे राहील निश्चल
घेई माझा करी हात
चालवी मज ध्येयाप्रत ॥ ३ ॥

देई मजला दृढालिंगन
चालेन संगे सारे जीवन
भिजले जरि बरसातीने
पुढेच पाऊल तव ऊबेने ॥ ४ ॥

— प्र. ना. नेमाडे
नासिक.

# बिंदू

प्रदीर्घ, प्रांजळ रमणीय होय
सर्वस्वी मी एक बिंदू होय.

लहान दिसे, परी किर्ती त्रिलोकी असे
स्वछंदे दशदिशात, माझाच निनाद असे.

पक्षी विहंगम बावरणे, हेच माझे ब्रीद असे
साकार निराकार, सर्वव्यापी, तांडव नृत्य करीत असे.

ज्याचे अर्धनारी नटेश्वर प्रारुप असे
सूक्ष्म – विशाल हेची कटाक्ष असे ....
म्हणून मी परमेश्वर असे.

— शशिकांत सोहोनी
खांडवा (म. प्रदेश)

# अहंकार

काळवंडलेले ढग
एकदा भटक भटक भटकले
कुठे त्यांना स्थैर्य
नाही जरी लाभले !

अेका उंच शिखरावर
भेटले एकमेका कडाडून
त्यातूनच निघाला एक
अहंकार पेटून ! !

— **अण्णा म. तोडकर**
**नासिक.**

# ईश्य !

धुक्याची झिरझिरीत मच्छरदाणी
त्यात झोपलेली पहाट

जेव्हा तिला जाग येते
किलकिले डोळे करून बघते
तेव्हा कोकिळा गात असते.

खोडकर सूर्य
तिची खोडी करतो.
आरक्त होऊन ती विचारते–

हे काय ?
सांगू ?
हो सांग ! !

तुला चुंबावेसे वाटते
ती लाजून म्हणते–
ईश्य !

— रा. म. तोडकर

मनमाड.

# मला वाटते !

मला वाटते
फुल व्हावे गुलाबाचे
सुगंध दरवळणारे
पण कधीच न कोमेजणारे ....

कधी शिखरावर
तर कधी शिरावर
सदुपयोग होण्यासाठीच
नेहमी तडफडणारं .... ....

आणि शेवटी जाताना
व्हावे गुलकंदा सारखे
जाता जाता जिभेला
चव देऊन जाणारे

— श्रीकृष्ण जोशी
मनमाड.

# वेल !

एक फूल उमललं आहे
सोनेरी किरणात न्हात आहे
हसत हसत सांगत आहे
"आनंद मला शोधत आहे !"

एक फूल टपोर आहे
पांढऱ्या धाग्यात ओवलं आहे
आर्त स्वरात सांगत आहे
"निर्जीव जीणं जगत आहे !"

एक कळी उमलत आहे
वेली वरती झुलत आहे
भीत भीत पुसत आहे
"जीवनात सारे असेच आहे ?"

— विठ्ठल ज. सदामते
रामानंदनगर.

# या पहाटे

या पहाटे बल्बुलांनी शोकगीते गायिली
मी अशी माझी चिता माझ्या करांनी बांधिली

वेचिल्या मी तरूतळी या चांदण्याच्या सावल्या
ज्या कधी माझ्या प्रियेच्या दर्शना आसावल्या
आज का पाने गळाली पापणी पाणावली

साज सोनेरी क्षणांचा मी स्मितांना लाविला
या मनाच्या अस्मितेचा गंध तू ना जाणिला
का फुलांनी भारलेली वल्लरी ही तोडिली.

स्वप्नवेड्या पाखरांना मी मनी सांभाळिले
प्रीतीचा देऊन चारा मी तया कुरवाळिले
दूर ती आता उडाली बंधने ना राहिली.

— शांताराम नांदगांवकर
मुंबई.

# गीत

काल तू स्वप्नात आली, बोलली काहीच नाही
का उभ्या चैत्रास तेव्हा पालवी फुटलीच नाही ॥ धृ ॥

पाहिला रक्तीम गाली रंग तो ओठावरी
गौरसे अंगांग झाकी तलम साडी केशरी
मुक्त केशासी सखे तू आज का विणलेच नाही ॥ १ ॥

भेटता संकोच कसला पाठमोरी का उभी ?
का हवा एकांत बघ त्या तारका दडल्या नभी !
गीत हे आकार घेता सूर का जुळचले नाही ॥ २ ॥

पौर्णिमा अंधार प्रसवी तू सखे जाताक्षणी
मी जगाचा अंत पाही शून्य त्या जागेपणी
हरवली सृष्टी परंतु चित्र ते पुसलेच नाही ॥ ३ ।

— पंढरीनाथ सोनवणी
नासिक.

# मैफिल

रंगली मैफिल माझ्या वेदनांची आगळी ....
भैरवीचे सूर ल्याली, रात्र आणि काजळी ....

आसवांना पूर होता, भंगले नयनात गीत ....
रीतीच्या बंधात झुरली, एक माझी आज प्रीत ...

कंप होता त्या स्वरांना, भारलेला कंठ दाटे ....
दग्ध झाल्या पाकळ्यांना, आसऱ्याची ओढ वाटे ....

आर्त होत्या भावनांच्या चिंबलेल्या स्वप्न धारा ....
पांघरूनी वेड धावे, वेदनांचा घोर वारा ....

गोठल्या ओठात होते, गोठलेले शब्द माझे ....
काजळ्या रात्रीत माझ्या मृत्युची घंटाच वाजे....

— किशोर दीक्षित
ठाणें.

# माझा गांव

माझ्या गावाच्या वाटेत
उभी आमराई मोठी
आंबे पाडाला लागले
जाई भरुनही कोठी ॥ १ ॥

माझ्या गावाच्या वाटेत
आहे नदी गोदामाई
गंगा दुसरी धरेची
तुम्हा आम्हाची ही आई ॥ २ ॥

माझ्या गावाच्या वाटेत
मोद सर्वांनी लुटावा
हिरवी हिरवी झाडे
निसर्गाचा मौळी ठेवा ॥ ३ ॥

माझ्या गावाच्या वाटेत
असा सुंदर देखावा
मोठ्या निळ्या आभाळात
बगळ्यांचा उडे थवा ॥ ४ ॥

माझ्या गावाच्या वाटेत
पडे चांदण्यांची रात
गप्पा गोष्टी करताना
जाई निघून ती गात ॥ ५ ॥

— मुरलीधर खैरनार
नासिक.

# ऊन आज आजारले

ऊन आज आजारले
कलले ते कवडसे
तमाशाल पांघरून
भिंतीवर विसावले

मंदमंद गारव्याने
तृण – पुष्पे शहारली
अंधाराची बरसात
करुण्याने मोहरली

— कु. नीलिमा टेंबे
दादर ( मुंबई. )

# जीवन ज्योत !

आठवणींच्या खांबांनी
उचलेल्या स्वप्न मंदिरी
हृदयान्तरीच्या खोल गाभाऱ्यात
नैराश्येच्या दाट अंधारात
तुझी मूर्ति मी पूजते आहे

आशेच्या समयीला साथीला घेऊन
अजूनही उगवतीचा सूर्य
मावळतीला मी बघते आहे
वसन्ताच्या पालवीतून
शिशिरातल्या समीधाही बघते आहे

पण....
अजून तू आला नाहीस
आयुष्य सरले तरी !
जीवन ज्योत तुझ्याच चरणी
विझू लागली तरी ! !

— लक्ष्मीकान्त जोशी
नाशिक

# मी ना कुंती

तुला टाकता ऊर माझा नदी किनारी उडे
प्रीति बाळा पडली अपुरी मदांध कामापुढे ।। धृ ।।

अशांत पाणी वाजे खळखळ
वारा झोंबे करूनी सळसळ
कशी कळावी तुजला तळमळ
मी पण माझे नुरे अंतरी मनास जाती तडे ।। १ ।।

अशाच वेळी स्मरते कुंती
दैवी लाभली होती शक्ति
कर्णा दिधली तरी आहुति
आई वाचुनी सांगा कोणी कुठे कुणाचे अडे ।। २ ।।

हो बाळा पण, तू गेल्यावर
दुःख मनातून नेत्री पाझर
चल माघारी मी देईन उत्तर
मी ना कुन्ती तशी सानुल्या ! जीव तुझ्यावर जडे ।। ३ ।।

— चंद्रकान्त स. साबळे
नासिक.

# गोष्ट गहिरी

गहरी वारा गोष्ट सांगतो मानवास मोठी
अति मैत्री ठरते खोटी, अति प्रीति चूक मोठी ! !

गहरी वाऱ्या वहात रहा सदा तू भिरभिरी
भरू दे अंगात हुडहुडी अन् शिरशिरी
वाऱ्याचे झोत परतूनी वाऱ्यावर विरून तरी
मित्राची कटु भाषा लागून राहाते जिव्हारी ।। १ ।।

गोठवा, गोठवा, गडद आकाश
त्याचे नाहीत जवळ पाश
जितके मित्र करिती आम्हा हताश
मानवी मनास करिती निराश ।। २ ।।

– ना. भा. औटी
नासिक.

# अरे मानवा मानवा !

( चाल:- संसार संसार )

अरे मानवा मानवा । खडी स खरे सारखे
बोलणे तुझे असू दे । तुझ्या मनास जे जिंके ॥१॥

अरे मानवा मानवा । सदा विनयशील राही
नम्रता ही अंगी ठेवी । धैर्याचा तू मेरू होई ॥२॥

अरे मानवा मानवा । दीनांचा तू होय वाली
खरोखरी जो भुकेला । घास त्याच्या मखी घाली ॥३॥

अरे मानवा मानवा । धरू नको गर्व मनी
सुवर्णाची रम्य लंका । गेली त्या पायी जळुनी ॥४॥

आम्ही सारी देवा घरची । लेकरे आहोत एक
जात पात नको मानू । धडा हाच मनी शिक ॥५॥

– सौ. कुसुम जगन्नाथ कोल्हापुरे
सातारा.

# सज्जनांच्या जीवनाला

सज्जनांच्या जीवनाला ।
वेदनांचा शाप का ?
दुर्गुणांच्या वर्तनाला ।
तो तुझा उःशाप का ?
दीनता ही, लीनता ही ।
लाजवीते का तुला ?
आसुरी उद्दाम होणे ।
आवडे का हे तुला ?
वाटते वेड्या मनाला ।
मजवरी अन्याय का ?
कर्म अमुचे भोगण्याला ।
लाभला हा जन्म ना ।
कर्मयोगी होऊनिया ।
संपवावे नियमना ।
नैराश्य दाटे अंतरी या ।
वाटते संपेल का
आळवावे आठवावे ।
नित्य नैमित्तिक तुला ।
साथ नाही इंद्रियांची ।
शल्य हे बोचे मला ।
सत्कृपा व्हावी तुझी ही ।
आस पुरी होईल का ?

— सौ. मनोरमा माधव जोशी
नासिक.

# करा जनतेची सेवा

संत महंत दामाजीपंत
मंगळवेढी दयावंत ॥ १ ॥

दीन दुबळे सान थोर
मुक्त केले धान्यभांडार ॥ २ ॥

नाही पाहिले स्वार्थाला
अंगीकारी मानवतेला ॥ ३ ॥

कान्होपात्रा चोखामेळा
भक्तीमार्ग दावी वेळोवेळा ॥ ४ ॥

कितीतरी ऐशी नावे
जनता जनार्दनी भावे ॥ ५ ॥

देशसेवा, ईश्वरसेवा
कलियुगी, मंत्र व्हावा ॥ ६ ॥

कृपालोभ चित्ती ठेवा
करा जनतेची सेवा ॥ ७ ॥

— **माधव बाळकृष्ण जोशी**
**नासिक.**

# दर्शन

जीवनाच्या आरशात
मी माझेच रंगलेले थोबाड

व्रण चढलेले ........
चोवीस थेंबाच्या रांगोळीत

अर्धवट रंग भरुन ........
मीच मला 'अस्पष्ट' पहातोय !

आरश्याच्या तुकड्यासह
जीवनाची 'प्रतिष्ठा' जोडू पहातोय

प्रतिष्ठेला तडा गेल्यानंतर
'भविष्य' आठवतोय !

— प्र. ल. वैद्य
नासिक.

# एक जीवघेणी सोबत

जीवनाच्या वाटेवर....
सुंदर फुले फुलत असताना,
काटे वेचण्याचे धाडस, मी केले.
जे मनात होते, तेच कृतीत उतरले.
शेवटी माझ्या जीवनात
एकच दुःख राहिले.
काट्यांची सोबत घेताना,
फुलांचे फुलणेच थांबले.

— विलास चौधरी
नासिक.

# जीवनप्रवास

संसार सागरात तू असतेस नौका
नी मी असतो वल्हे
प्रवासी असतात आपली मुले
महागाईची भरती ओहटी येत असताना,
तोल जात असतो सदैव तिचा
लाटारुपी करांनी !
डगमगत असते तिचे तळ .... !
कधी अवचीत सांसारीक वादळात
ती घेऊ पहाते चिरनिद्रा !

— अनिलकुमार मैंद
नासिक.

# घरोघर मातीच्या....

घरोघर मातीच्या
चुली असतात
अशी म्हण वाचतो
अन् तसेच वागतो ....

संधी येत असते
वेळपण येते
आम्ही मात्र
आमचे नसतो ....

कुठल्या तरी
व्यर्थ भानगडीत
उगाच शिरतो
संधी वाया जाते
वेळहि टळून जाते
उगीच जिव्हा वदते
तुम्ही तसे आम्ही ....

घरोघर मातीच्याच
चुली असतात.

— राम गंभीरे
नासिक.

# होता पखरण !

कटीवर हात, वीटेवर पाय
ठेवून उभा पंढरीनाथ
विठ्ठल नेत्रात त्रैलोक्यदर्शन
सावळ्या रंगात आत्मदर्शन ॥ १ ॥

रुक्मिणी वल्लभा, दीनदयाळा
सांभाळ आम्हा भक्त भाविका
बळ दे आम्हा वल्हविण्याला
संसार सागरी जीवित नौका ॥ २ ॥

तुझेच रुप, तुझेच नाम
अंतरी येते धावत हासत
तुझेच भजन सतत गात
आत्म्याचे मीलन नादब्रम्हात ॥ ३ ॥

आषाढी कार्तिकी, पालख्यांची दाटी
दिंड्या पताकांची धून चराचरी
'विठ्ठल-विठ्ठल' अमृतमय वाणी
भाविकांचा सूर चंद्रभागा तीरी ॥ ४ ॥

तूच माऊली तूच साऊली
मम भक्तीची, आयुष्याची
तुझिया कृपेची, होता पखरण
अद्वैत जन्मते द्वैत लोपून ॥ ५ ॥

— **कृष्णकांत नांदगावकर**
सातारा.

## माध्यान्ह

कुठेतरी ओघळलेले दुबळे क्षण ....
कुठेतरी हरवलेल्या हळव्या भेटी ....
कुठेतरी गहिवरलेल्या मादक आठवणी ....
विसरायच्या नाहीत म्हणून ....
दुसऱ्या प्रहराच्या रखरखीत उन्हात ....
मीच तडफडतेय !
विसाव्यासाठी आसरा शोधीत
वणवण भटकतेय !!

## सुख

नशिबाच्या अंगणात प्राजक्ताची झाडे
लावावी लागतात का रे ?
अन् लावली तर ती बहरतात ?
नाही रे !
असे जर असते तर,
प्रत्येकाच्या जीवनात ....
प्राजक्ताचा सडा पडला असता.
कुणी सांगावं, कदाचित तो ....
गुदमरुनही गेला असता, त्या प्राजक्ताच्या भाराने !

— कु. हेमलता निजामपूरकर
नासिक.

२४०४
जा/ख
२२-६-०६

# प्रलय

व्हायचाच असेल प्रलय तर, होऊन जाऊ दे एकदाचा
भग्नतेला सामोरे जाऊन चिरंतनाचा अट्टाहास कशाला ?
कोण्या एके काळी ... कसलाच स्पर्श नव्हता मला.
सौंदर्याच्या ध्यासातून धुक्याआडची सृष्टीही ....
दिसत होती मोहरलेली .... आणि
मनाच्या परडीत होती, ताऱ्यांची प्राजक्ती फुले !
मी तर एक झरणी होते.
अंताचे भान नमणारी !
आरंभाची जाणीव नसणारी !!
पण, चिरंतनाचा ठाव घेताना,
मातीच्या ढेकळासारखं ते सुख विरलंय,
वास्तवाच्या गढूळ डबक्यात !
एकीकडे भग्नतेची आग .... काळीज जाळणारी !
आणि रोमारोमात एक अमृत-धार कणाकणानं पाझरणारी!!
किनाऱ्यावरील खडकाला, सागरलाटा चुंबीत असता,
शोषतात त्याचा कण न् कण ....
कधीतरी भरतीत, वाहून जाण्यासाठी !
आता वाटतंय, मरणं काय ! आणि जगणं काय ??
कशातच काही राम नाही !
विश्व कवेत घेण्यासाठी, हात पसरले मी !
पण हाती ? .... काहीच नाही .... अजून !
कधी तरी तोल ढळेल रे ! ढळला तर ?
जमिनीला पाय लागण्याआधीचं, प्रलय तरी होऊ दे !

— **कु. वसुधा बेलगावकर**
नासिक.

# काफिला

आठवणींचा हा काफिला ....
असा किती वेळ चालणार आहे,
या नीरव शांततेत ?
ही वाट धुक्यातली ! ओलसर चुकातली !
कधी चंद्र माथ्यावरचा, ढगाआड गेलेला ....
कधी वाळुतला पायरव, कानाशी राहिलेला ....
या वेलींची ही निःशब्द कुजबुज ! आणि –
क्षितिजावर संपलेले, कालचे वादळ .... शांत ! शांत !!
आज हा काफिला असाच पुढे गेला तर ?
थांबणार का ही, या काळजातली थरथर ??
रात्रीची नशा .... तर, आता उतरु लागलीय .... पैलतीर !

— प्रफुल्ल चौधरी
नासिक.



काफिला ........

राधाकृष्णाचा संबंध
हा केवळ प्रेमाचा
किंवा उपभोगाचा संबंध नाही.
परस्परात होणाऱ्या सर्वात्म विसर्जनाचे सूत्र
त्यात प्रमुख आहे.
कविताही त्याच प्रमाणे
रसिकाला केवळ आवडून चालत नाही.
ती त्याच्या अंतरंगात भिनावी लागते.
कवितेतील अनुभूती
ही त्याचीच अनुभूती व्हावी लागते
हे यश
फार थोड्या कविंना आणि काव्यांना लाभते.
पण, त्या दिशेने प्रवास करणाऱ्या
अनेक कविता या संग्रहात आहेत

कुसुमाग्रज